■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २९४ ■ शनिवार दि.१२ जुलै २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 294 ■ Saturday Dt.12 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# सब गोलमाल है भाई सब गोलमाल है! लक्ष्मण बेडसकरचे अनेक कुटाने बाहेर पण जि.प सिओ जितिन रहेमान यांचा आशीर्वाद आहे म्हणे?

## पाचशे कोटींच्या शिक्षण भरती घोटाळ्याचा मास्टरमाईंड बेडसकर व तत्कालीन एसीबीचे डिवायएसपी शंकर शिंदे वादाच्या भोवऱ्यात, कारवाई होण्याचे संकेत?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**लाच घेणारा व लाच घेताना पकडणाऱ्याला अधिकाऱ्यांने मुख्य आरोपी सोडून मध्यस्थी आरोपी करणारे दोघे सारखेच?**

# एसीबीचे शंकर शिंदेंनी बेडसकरला का सोडले? लाच घेणाऱ्याला सोडून मध्यस्थी करणाऱ्यास केले आरोपी?

## प्रभारी गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांचा महिला शिक्षिका सोबत झालेला वाद आर्थिक देवाण-घेवाणवरूनच; प्रकरण दाबून टाकल्याची चर्चा?

### बीडच्या शिक्षण विभागात भ्रष्टाचाराची छाया? प्रभारी गटशिक्षणाधिकारी चर्चेत!

### मुख्य आरोपी लक्ष्मण बेडसकर यांच्यासोबत आर्थिक देवाणघेवाण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे?

### अधिकाऱ्याला सहआरोपी करून या प्रकरणाची सखोल चौकशी करायला हवीच!

बीड । प्रतिनिधी

बीड तत्कालीन पोलीस उपअधीक्षक श्री. शंकर शिंदे व त्यांची टिम लाचलुचपत कार्यालय बीड यांनी केज गटशिक्षणाधिकारी यांच्या निवासस्थान ठिकाणी लाच घेण्याठी मदत करणार दलाल याच्या वर ऋखठ छे. ०६६७ दि.३१/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपी प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मण बेडसकर यांच्यासोबत आर्थिक देवान घेवाण करुन मुख्य आरोपीचे नाव





वगळण्याच्या संबधीत अधिकाऱ्यावरती सह आरोपी करुन या प्रकरणाची परत चौकशी मार्फत तत्कालीन पोलीस उपअधीक्षक श्री. शंकर शिंदे, व त्यांची टिम लाचलुचपत कार्यालय बीड यांनी केज गटशिक्षणाधिकारी यांच्या निवासस्थान ठिकाणी लाच घेण्याठी मदत करणार दलाल याच्या वर ऋखठ छे. ०६६७ दि.३१/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन मुख्य आरोपी यांनी तक्रारदार यांच्या वॉइस रेकॉर्डमध्ये सर्व काही प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मण बेडसकर यांच्यासोबतचा झालेल्या संवाद व संभाषणाचा पुरावा असताना

पान २ वर

### लक्ष्मण बेडसकर यांना मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांचा आशीर्वाद?

बीड जिल्ह्यातील शिक्षक भरती घोटाळा वाणिज्य संस्था चालकांचा गळयातील तित्व ५०० कोटीच्या भ्रष्टाचाराचा मास्टरमाईंड लक्ष्मण बेडस्कर या अधिकाऱ्याचे अनेक कारणे बाहेर येत आहेत. आणि या अधिकाऱ्याला आता बीडचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिथिन रहेमान यांचा आशीर्वाद असल्याची चर्चा आता बीड जिल्हा परिषद मध्ये रंगू लागली आहे. केज कार्यालयात तास दोन तास ऑफिसला बसल्यानंतर दिवसभर बेडसकर हा जिल्हा परिषद मध्ये तळ ठोकून का असतो तर याला आता नव्याने आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी जिथिन रहेमान याचा आशीर्वाद असल्याची बोलले जात आहे?

### लक्ष्मण बेडसकर यांचा पदभार न काढावा म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल?

बीड जिल्हा शिक्षक भरती घोटाळ्यातील मास्टरमाईंड प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांचा स्वयघोषित सल्लागार तथा स्वीय्य सहाय्यक म्हणून संपूर्ण जिल्ह्याचा आर्थिक कारभार पाहणारा केजचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचा पदभार न काढावा म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करतो. व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पैसे कमवून देण्याचे तोंडी आश्वासन देतो या आमिषाला तर वरिष्ठ अधिकारी बळी पडत नाहीत ना अशी शंका व्यक्त होत आहे. सदरील प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांना मागील काही वर्षांपूर्वी एका महिला शिक्षकाला त्यांचे थकीत वेतन तसेच पगार बिल यांच्यावर स्वाक्षरी करण्यासाठी कार्यालयामध्ये आले असता त्यांना संध्याकाळी घरी याअसे सांगितल्यानंतर त्यांच्या कानाखाली चापट मारल्याची माहिती खात्रीलायक मिळत आहे.

# मुख्याधिकारी चव्हाणला न्यायालयीन कोठडी

## माजलगावमध्ये सहा लाख रुपयांची लाच घेतल्याचे प्रकरण

माजलगाव । प्रतिनिधी

सिमेंट रस्ता कामाचे बिल काढण्याच्या मोबदल्यात सहा लाख रुपयांची लाच घेताना गुरुवारी रात्री नगरपालिकेचा मुख्याधिकारी चंद्रकात चव्हाण यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले होते. दरम्यान, शुक्रवारी (ता.११) पोलिसांनी त्यास न्यायालयासमोर हजर केले, तेव्हा न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. शासनाच्या नगरोत्थान अभियान योजनेंतर्गत केलेल्या सिमेंट रस्ता कामाचे बिल काढण्याच्या मोबदल्यात तक्रारदाराकडे



मुख्याधिकारी चव्हाण याने बारा लाख रुपयांची लाच मागितली होती. तडजोडी अंती सहा लाख रुपये देण्याचे ठरले होते.

याबाबत तक्रादाराने छत्रपती संभाजीनगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यावरून विभागाच्या पथकाने गुरुवारी रात्री सापळा रचून पिताजीनगरी येथील किरायाच्या घरात चव्हाण यास सहा लाख रुपयांची लाच घेताना पकडले होते. त्याच्या घराच्या झडतीत पथकास ९४ हजार ८०० रुपयांची रोकड

पान २ वर

## घरासमोर लावलेली चारचाकी पेटवून नुकसान; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

दौलावडगाव । प्रतिनिधी

घरासमोर लावलेल्या चारचाकी वाहनाला आग लावून पेटवून देत नुकसान केल्याची घटना बुधवारी रात्री दोनच्या दरम्यान लिंबोडी ता.आष्टी येथे घडली असुन याप्रकरणी दोघांविरुद्ध आष्टी पोलिस ठाण्यात गुरूवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथील रामकिशन आश्रुबा आंधळे याची स्कार्पीओ क्रमांक एम.एच २० ए.एस.७७५६ ही चारचाकी घरासमोर लावली असताना बुधवारी रात्री दोनच्या दरम्यान गावातील दोघांविरुद्ध आग लावून पेटवून देत नुकसान केल्याची घटना घडली. या प्रकरणी गुरूवारी सकाळी आष्टी पोलिस ठाण्यात रामकिशन आश्रुबा आंधळे याच्या फिर्यादीवरून लिंबोडी येथील दोघाजणावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास आष्टी पोलिस करीत आहेत.




# शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यांचे काम करण्यासाठी बाल कामगार

## संबंधित अधिकारी, गुत्तेदार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

धारूर । प्रतिनिधी

धारूरकरांनी मोठ्या प्रमाणात त्रास सहन केल्यानंतर आता शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यांचे काम सुरू झाले आहे. या रस्त्याच्या कामात बाल कामगार काम करत असल्याचे दिसत आहे, त्यामुळे संबंधित गुत्तेदार अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे. शहरातील रस्त्याच्या विकासकामांना सुरुवात झाली आहे. परंतु, या कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यात भ्रष्टाचार होत असल्याची नागरिकांमध्ये चालू आहे. अधिकारी कोट्यावधीच्या कामाची साधी पाहणी करण्यासाठी येत नसल्यामुळे प्रत्येकाची ठरलेली टक्केवारी देऊन अधिकाऱ्याची भागीदारी असल्यामुळे गुत्तेदाराला कुणाची भीती नसल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे. धारूर शहरांमध्ये



व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज, चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे. पहिलाच डांबरी रस्त्याला टोकरून त्यावर खडी चा थर देऊन व त्यावर सिमेंटचा थर देऊन रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. परिणामी, रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे, असे नागरिकांचे म्हणणे

पान २ वर

# बीडमध्ये रस्त्यांच्या खड्ड्यांविरोधात अनोखा लढा

## राष्ट्रवादी भवन ते अक्सा मशीद रस्त्याची दुरवस्था; नागरिकांसह मिलिंद सरपते १५ ऑगस्टला 'बेशरम झाड लावून' करणार निषेध



बीड । प्रतिनिधी

शहेनशहा नगर परिसरातील राष्ट्रवादी भवन ते अक्सा मशीद चौकदरम्यानचा मुख्य रस्ता सध्या अत्यंत खराब स्थितीत असून, नागरिकांच्या दैनंदिन हालअपेष्टा आणि अपघाताच्या घटनांमुळे संताप उसळला आहे. प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने परिसरातील नागरिकांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी 'बेशरम झाड लावून' अनोखे निषेध आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे.

या मार्गावर अनेक खोल व मोठे खड्डे पडले असून, वाहनचालक आणि पादचारी नागरिकांसाठी हा रस्ता अपघाताचा सापळा ठरला आहे. विशेषत: या रस्त्यावरून अलहुदा उर्दू शाळा व मदरसामध्ये जाणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच वृद्ध, महिलावर्ग आणि रुग्णांनाही प्रवास करताना अत्यंत त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होते, कारण खड्ड्यांत पाणी साचून अपघातांचे प्रमाण वाढते.

प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, नागरिकांचा रोष

सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी या संदर्भात जिल्हाधिकारी बीड, सह-आयुक्त नगर परिषद प्रशासन संभाजी नगर, खासदार आणि आमदार यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवले आहे. यामध्ये त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर १५ ऑगस्टपूर्वी रस्त्याच्या दुरुस्तीची ठोस पावले उचलली गेली नाहीत, तर नागरिक व कार्यकर्ते 'बेशरम झाड लावून' प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदवतील.

आंदोलनाची पुढील टप्प्यातील रणनीती: १. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नागरिक मतदानाचा बहिष्कार करतील. २. मुख्याधिकारी हटाव - बीड शहर बचाव आंदोलनाची घोषणा करण्यात येईल. ३. जनआंदोलन अधिक तीव्र करून शासनाचा जागर करण्यात येईल. हा लढा केवळ खड्ड्यांविरोधात नाही, तर प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात आहे, असे सरपते यांनी सांगितले. नागरिकांची संयमाची परीक्षाच सुरु असल्याचे त्यांनी नमूद केले. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचे आणि उत्तरदायित्वाची मागणी करण्याचे नागरिकांना हक्क आहेत. पण जेव्हा प्रशासन हा आवाज ऐकण्यास तयार नसतो, तेव्हा रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय राहत नाही, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. बीड शहरातील नागरी सुविधा आणि सार्वजनिक सुरक्षा यांकडे प्रशासन गांभीर्याने पाहील, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## जिल्ह्यातील नरेगा योजनेमधील वैयक्तिक लाभाचे कुशल देयके लवकर वाटप करावेत : सुजित शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी



महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या जलसिंचन विहीर, फळबाग, शेततलाव या कामाच्या कुशल बील गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, रोजगार हमी योजना कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले यांना युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी पत्रव्यवहार करून वैयक्तिक लाभाचे कुशल देयके लवकरात लवकर देण्यात यावे अशी विनंती केली होती. याची दखल घेउन उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व रोजगार हमी कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी पंचायत समिती बीड येथील मग्रारोहयो अंतर्गत कुशल निधी प्राप्त झाला आहे. परंतु अद्याप पर्यंत ते कुशल देयके वाटप करण्यात आले नाही. सदरील पंचायत समिती कार्यालय मधील वैयक्तिक कामाचे कुशल बील हे सरसकट सोडण्यात यावे यात कोणतेही बील मागे ठेवण्यात येऊ नये, अशी मागणी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी गटविकास अधिकारी बीड यांच्याकडे केली आहे.

## हनुमान नगरच्या रस्त्याचे काम पूर्ण करुन अमर नाईकवाडे यांनी नागरिकांचा प्रश्न सोडविला

### कित्येक दिवसांपासून प्रलंबित रस्ता काम अखेर पूर्ण



बीड । प्रतिनिधी

गेली अनेक वर्षे दुरावस्थेत असलेला आणि नागरिकांच्या समस्येचे मूळ ठरलेला पेठ बीड येथील हनुमान नगर येथील रस्ता अखेर नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या प्रयत्नांमुळे पूर्ण करण्यात आला आहे. सदरील रस्त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे लेखी मागणी करून नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी पाठपुरावा केला होता.

शहरातील हनुमान नगर येथील नागरिकांच्या दळणवळणाच्या सोयींसाठी मुख्य असलेला रस्ता हा अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. सदरील रस्त्याची अवस्था इतकी वाईट होती की पावसात तिथे पाणी साचायचे, पादचार्यांना चालणेही कठीण व्हायचे. नगरसेवक अमर नाईकवाडे यांना स्थानिक रहिवाशांनी रस्त्याची मागणी केल्यानंतर त्यांनी त्यावेळचे पालकमंत्री धनंजय मुंडे असतांना त्यांच्याकडे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली लेखी मागणी केली होती. त्यानंतर सदरील रस्त्याचा प्रश्न आज रोजी जिल्हा नियोजनमधून मार्गी लागला आहे, तसेच रस्त्याचे काम संपुर्ण झाले असून आज रोजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी सुरू असलेल्या कामास भेट दिली केले.

यावेळी हनुमान नगर येथील रामदास सरवदे, निवृत्ती जगताप, कानडे तात्या, जालिंदर मुळे, भास्कर चांदणे, गोरख सरवदे, संतोष क्षीरसागर, संतोष चांदणे, महेश खूपसे, अशोक शिंदे, रवींद्र क्षीरसागर, पप्पू कांबळे, राहुल काळवणे, आकाश काळवणे, सचिन गालफाडे, पवन खूपसे, नितीन वीर, कांता दौंड, काळू कसबे, सखाराम वैगुंडे, प्रकाश अवसरमल यांची उपस्थिती होती. यावेळी स्थानिक नागरिकांनी नगरसेवक अमर नाईकवाडे यांचे आभार मानले.

## मातंग समाजाची वाघीण प्रियंका लांडगे उतरली रस्त्यावर न्याय द्या

### अत्याचाराच्या निषेधार्थ केज शहरात लहुजी शक्ती सेनेने केला रास्ता रोको

### आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी: आंदोलनामुळे वाहतूक ठप्प





केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात मतिमंद तरुणीवर अत्याचार आणि एका गतिमंद मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न झाला होता. या घटनेच्या निषेधार्थ लहुजी शक्ती सेनेच्या वतीने केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शुक्रवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या वेळी सहायक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे व सहायक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारले. केज तालुक्यातील एका गावातील गतिमंद मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या बाळू जालिंदर कांबळे याला तत्काळ अटक करावी, केज शहरात लहुजी शक्ती सेनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

अल्पवयीन मुलीस पळवून नेणाऱ्या अजिंक्य गालफाडे याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात यावी, बीड जिल्हा व केज तालुक्यातील महिला सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करून महिलांचा आत्मविश्वास निर्माण होईल या अनुषंगाने काम करावे या मागण्यांसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा प्रियंका लांडगे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

पान १ वरून...

### डीवायएसपी शंकर शिंदे व त्यांच्या टीमने...

सुध्दा त्यांना याप्रकरणातुन आर्थिक देवान घेवान करुन मुख्य आरोपीचे नाव वगळण्यात आले आहे. प्रभारी गटशिक्षणाधिकारी केज श्री. लक्ष्मण बेडसकर यांच्यावरती गुन्हा नं. ३०८७/२०१३ रोजी केज पोलीस स्टेशन येथे शिक्षकाकडुन लाच घेताना रंगेहात पकडल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होतो, व परत त्याला त्याच पदावर प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्याचा पदभार केज याच पदावरती नियुक्ती देण्यात आली व त्याच ठिकाणी दि.३१/१२/२०२४ रोजी सहकाऱ्याच्या मदतीने लाच घेताना पकडण्यात आले, परंतु तत्कालीन पोलीस उपधीक्षक लाचलूचपत कार्यालय बीडचे श्री. शंकर शिंदे व त्यांची टिम व तपासी अधिकारी यांनी आर्थिक देवान घेवान करुन मुख्य आरोपीला वगळून सहकाऱ्याला आरोपी दाखवुन प्रकरण दाबण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांने केलाअसल्याने या प्रकरणाचा तपास परत इतर जिल्ह्यातील लाचलूचपत कार्यालयातील समिती मार्फत चौकशी करुन वरिल अधिकाऱ्यांना सह आरोपी करुन तात्काळ गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

सविस्तर वृत्त असे की त्यांच्याच कार्यालया अंतर्गत शिक्षकाकडून लाच घेतांना पकडलेले केज येथील तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मण बेडसकर यांना परत त्याच पदावरती बेकायदेशीर केज प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मण बेडसकर यांना परत त्याच पदावरती बेकायदेशीर केज गटशिक्षणाधिकारी म्हणून पदभार दिलेला तात्काळ रद्द करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना आपल्या कार्यालया मार्फत तात्काळ आदेश देण्यात यावे.

सदरील प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मण बेडसकर केज जि. बीड याना दिलेला बेकायदेशीर पदभार तात्काळ रद्द करुन इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे देण्यात यावा तसेच सदरील गटशिक्षणाधिकारी हा कारागृहामध्ये काही दिवस मुक्काम करुन आलेला आहे. परत ज्या ठिकाणी प्रभारी गटशिक्षणाधिकारी केज जि. बीड येथे असतांना लाच घेतली होती. परत त्या ठिकाणी त्याच पदावर प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून बेकायदेशीर पदभार दिला तो अतिरिक्त पदभार तात्काळ काढुन घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना द्यावेत अशी मागणी इंजिनियर सादिक इनामदार राष्ट्रीय अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांनी दिली आहे.

### शहरातील मुख्य...

आहे. सामाजिक कार्यकर्ते यावर चुप्पी साधून असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करताना प्रथम आवश्यक ते खोदकाम करून त्यामध्ये चार इंच जाडीच्या दगडांचा अर्धा फूट थर टाकून त्यावर थोडा मुरूम टाकून रोड रोलरने दबाई करावी लागते. नंतर त्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरणाचा थर टाकण्यात येतो, परंतु, असे करताच गुत्तेदाराने चक्क डांबरीकरणाचा रस्ता पूर्ण खोदला त्यातून निघालेले मटेरियल पुन्हा त्यातच वापरण्यात आले होते पण दैनिक आरंभ वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित केल्यानंतर पहिले डांबरीचे मटरेल काढून टाकण्यात आला पण. या प्रकरणात भ्रष्टाचार झाला आहे. १०० मीटर रस्ता बातमी प्रकाशित केल्यामुळे दर्जेदार झाला पण राहिलेला दर्जेदार रस्ता करून घेण्यासाठी संबंधित अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे. जिल्हाधिकारी यांनी चौकशी करून संबंधित गुत्तेदारसहीत अभियंत्यावर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### मुख्याधिकारी चव्हाणला...

आढळली. रात्री उशिरा चव्हाणवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायाधीश राजश्री परदेशी यांनी चव्हाण यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सरकारी पक्षातर्फे ॲड. आर.ए. वाघमारे यांनी, तर चव्हाण याच्या बाजूने ॲड. शरद सोळंके तसेच ॲड. विक्रम कदम यांनी बाजू मांडली. दरम्यान, माजलगाव नगरपालिका विविध कारणाने गाजत आहे. यापूर्वी देखील तत्कालीन दोन मुख्याधिकारी व एका नगराध्यक्षावर गुन्हा दाखल झाला होता. काही दिवसांपूर्वी तत्कालीन कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हे नोंद झाले होते.

## लोकनेत्या ना.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बऱ्हाणपूर येथे कापडी पिशव्या वाटप

### सेवा पंधरवड्याचे औचित्य साधून प्लास्टिकमुक्त गावाचा संकल्प : गणेश लांडे



बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री आणि लोकनेते पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यभर सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर बऱ्हाणपूर गावात प्लास्टिकमुक्त गाव या संकल्पनेवर आधारित पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला. ग्रामपंचायतीचे उपसरपंच गणेश लांडे यांच्या पुढाकाराने गावात कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला गावाचे सरपंच गोरख शिंदे, गोरक्षनाथ महाराज लांडे, लिंबाजी लांडे, तसेच इतर जेष्ठ नागरिक आणि लहान थोर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणीय दुष्परिणाम, मातीची गुणवत्ता कमी होणे, जनावरांवर होणारे दुष्परिणाम याविषयी माहिती देण्यात आली. ग्रामस्थांनी प्लास्टिकचा वापर बंद करून पर्यावरणपूरक कापडी पिशव्या वापरण्याचा निर्धार व्यक्त केला.

उपसरपंच गणेश लांडे यांनी यावेळी सांगितले की, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आम्ही बऱ्हाणपूर गाव प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. हे फक्त उपक्रम नाही, तर एक सामाजिक चळवळ आहे. या उपक्रमामुळे बऱ्हाणपूर ग्रामपंचायतीने पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले असून, हा कार्यक्रम इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### केज येथील ठाकूर रामकृष्ण परमहंस परिवाराचा गुरुपोर्णिमा उत्सव आनंदात संपन्न

## अज्ञानाच्या 'अ' पासून आश्चर्याच्या 'आ' पर्यंत घेवून जाण्याचं काम सद्गुरु करतात : ह.भ.प. समाधान महाराज




केज । प्रतिनिधी

केज येथील प.पू.वै. वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या कृपा आशिर्वादाने चालत असलेला गुरुपोर्णिमा उत्सव यावर्षी देखील विठाई मंगल कार्यालय केज येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वै.वासुदेवराव खंदारे गुरुजींच्या वृंदावन धाम या निवासस्थानी ठाकुर रामकृष्ण परमहंस, शारदा माता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचेपूजन करण्यात आले. व नंतर वृंदावन धाम येथून प.पू.वै. वासुदेवराव खंदारे गुरुजींच्या पादुका पालखी मध्ये ठेवून विठाई मंगल कार्यालया पर्यंत पायी दिंडी काढण्यात आली.

या कार्यक्रम स्थळी वै.प.पु. वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून गुरुमाई खंदारे आईंची पाद्य पुजा करण्यात आली. यावेळी जेष्ठ गुरु बंधु ह.भ.प.भावरत्न गुरुदास समाधान महाराज शर्मा यांनी गुरुजींनी सर्व साधकांना दिलेली ध्यान, प्राणायाम साधना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, तसेच ध्यान, प्राणायाम साधनेने जीवनात कसे अमुलाग्र बदल होतात हे सांगितले व गुरुजींच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच यावेळी छत्रपती संभाजी नगर येथील स.भु.महा विद्यालयाचे प्राचार्य विवेक मिरगणे सर, दिपाताई काटे व उत्रेश्वर जाधव यांनी गुरुजींनी दिलेल्या ध्यान साधने विषयी अनुभव कथन केले.

यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील प.पु.वै. वासुदेवराव खंदारे गुरुजींचे शिष्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सर्व शिष्य साधकांना प.पु.वै.वासुदेवराव खंदारे गुरुजींनी दिलेली ध्यान साधना रोज न चुकता करावी यासाठी भावरत्न गुरुदास ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांनी साधकांना शपथ दिली. या कार्यक्रमात दिंडीत सहभागी साधकांचा दिव्य रिंगण सोहळा पार पडला. सर्व ध्यान प्राणायाम साधकांनी गुरुस्मरण करून गुरु पोर्णिमा सोहळा महा प्रसाद घेऊन संपन्न झाला.

## माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने स्पॉट पाहणी

### कर्मचारी व अधिकारी कार्यालयात वेळेवर न आल्यावर चौकशी करु : बालासाहेब गवळी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात उपजिल्हा रुग्णालय येथील ढिसाळ व मनमानी कारभारामुळे रुग्णालयातील पेशंटचे हाल पाहायला मिळत आहेत त्यामुळें शासनाच्या दिलेल्या वेळेत एकही कर्मचारी अधिकारी व डॉक्टर उपस्थित नसल्याचे माहिती अधिकारी व पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने केलेल्या स्पॉट पाहणीत निदर्शनात आले. येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांसह तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांना तात्काळ रुग्णसेवा न मिळाल्यामुळे तासनतास ताटकळत बसावे लागत आहे मात्र शासनाच्या जीआर नुसार वेळेचे पालन न करणाऱ्या डॉक्टर, नर्स व शिपाई यांच्यावर वैद्यकीय मुख्य अधिकारी यांचे वचक न राहिल्यामुळे हा प्रकार वारंवार घडत असल्याचे सांगितले जात आहे त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकार्यामुळे रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. तरी या मनमानी कारभार सुरु असल्याने येथे उपचारासाठी येणार्या रुग्णांची हेळसांड होत आहे. येथील वैद्यकिय अधिकारी घोडे काही हलेना अन् रूग्णांना उपचार काही मिळेनात अशी अवस्था गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयाची झाली आहे.

माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने कार्यकारणी गेवराई तालुकाध्यक्ष बालासाहेब गवळी यांच्यासह टीमने शासनाच्या वेळेत दिनांक १० जुलै रोजी सकाळी सकाळी ८.३० वाजता स्पॉट ऑन कॅमेरा पाहणी केली असता तेथील दुरावस्था व घाणीचे साम्राज्य व व प्रत्येक ठिकाणी जाळ्या निर्माण झाल्या होत्या





रुग्णांच्या नातेवाईकांच्या तक्रारीचा सूर पाहायला मिळताक्षणी ते कामचुकार व उशिरा येणाऱ्यांना चांगले धारेवर घेतलें चौकशीत डॉक्टर नर्स व इतर कर्मचारी यांच्या गळयात शासकीय ओळखपत्र घालत नसल्याने आढळून आले तसेचसिजर चे डॉक्टर सोडता इतर केबिनचे डॉक्टर व कर्मचारी साडेनऊ वाजेपर्यंत हजर न झाल्याने रुग्णांची अडचण निर्माण झाली होती वेळेच्या नियमांचे उल्लंघन करून कुणी पण कुठल्याही वेळेला त्या ठिकाणी येत असतं प्रत्येकाला विचारले असता आजच उशिरा झाला असे त्यांच्याकडून बोलले जात होते.

माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे तालुका अधिकारी बालासाहेब गवळी व सन्माननीय उपअधीक्षक मगन दायमा, तालुका सचिव शुभम घोडके यांनी दिनांक १० जुलै रोजी सकाळी भेट दिली येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रचंड घाणीचे साम्राज्य व आणि स्वत: तालुका वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याने माहिती अधिकारी बालासाहेब गवळी चांगलेच भडकले त्यांनी कर्मचारी व डॉक्टर यांना चांगलेच फैलावर घेतलें उपजिल्हा रुग्णालयाला अचानक भेट दिल्यामुळे कर्मचारी व अधिकारी तसेच कामचुकार डॉक्टरांची भंबेरी उडाली तर रुग्ण आणि नातेवाईक यांच्याकडून कौतुक होत आहे. दरम्यान विविध विभागाला अशा अचानक भेटी देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतल्यास अधिकाऱ्याकडून सामान्य नागरिकांची होणारी अडवणूक व अधिकाऱ्यांचे माजोरपण आणि काम चुकारपणा याला आळा बसेल अशी प्रतिक्रिया रुग्णांच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

### जिल्हा परिषद शाळेला अचानक भेट

गेवराई शहरातील जिल्हा परिषद मुलांची शाळेत थेट प्रत्यक्ष पाहणीत शाळेच्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप, दररोज मिळणारा आहार, विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी सोय, तसेच खेळण्यासाठी मैदान, शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांची गुणवत्ता, व शाळेच्या विकसित बाबत चर्चा मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट यांच्याशी करण्यात आली. मुख्याध्यापक महोदयांनी प्रतिसाद उत्तमरीत्या माहिती दिली त्यानंतर शाळेच्या वतीने पूर्ण टीमचा सन्मान करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक वृंद उपस्थित होते.

# निर्भीड पत्रकार नवनाथ आडे लोकशाहीचा खरा रक्षक..!

## सत्यासाठी झगडणारा शूर सैनिक आणि धमक्यांनाही न झुकणारा समाजाचा खरा नायक

## लेखणीच्या जोरावर सत्तेला हादरवणारा निर्भीड लेखणीचा बादशाह

बीड । प्रतिनिधी

पत्रकारिता ही समाजाच्या आरश्यासारखी असते. ती समाजात घडणाऱ्या घटनांचे, समस्यांचे आणि सत्तेच्या कार्यपद्धतीचे सत्य प्रतिबिंब जनतेसमोर आणते. परंतु या आरशामध्ये सत्य दाखवण्याचे धाडस दाखवणारा निर्भीड पत्रकार म्हणजे नवनाथ आडे यांच्याकडे पाहिले जाते. त्याच्या लेखणीत भीती नसते, दबाव नसतो, फक्त आणि फक्त सत्य असतं. ते कडवट असो वा कडू, निर्भीड पत्रकार नवनाथ आडे हे कोणत्याही राजकीय, सामाजिक, किंवा आर्थिक दबावाला बळी न पडता सत्य मांडण्याचे काम करतात. त्याला माहिती असते की, आपले शब्द काहींच्या जीवाला घातक ठरू शकतात, पण तरीही ते थांबत नाही. कारण त्याचा उद्देश जनतेला खरी



### नवनाथ आडे : सत्यासाठी लढणारा निर्भीड लेखणीचा योद्धा!

निर्भीड पत्रकार हा लोकशाहीचा चौथास्तंभ अधिक मजबूत करतो. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार तसेच चुकीच्या कृत्यांवर प्रश्न विचारणं, भ्रष्टाचार उघड करणं, शोषितांची बाजू मांडणं ही नवनाथ आडे यांची खरी ताकद आहे. अशा पत्रकारांमुळेच लोकशाही टिकून राहते आणि सत्ता अधिक जबाबदारीने वागत असते.

माहिती पुरवणे हा असतो. अशा निर्भीड पत्रकारांच्या बातम्या केवळ मथळे देत नाहीत, तर समाजाला जागं करतात. आजच्या धकाधकीच्या आणि माहितीच्या महापुरात सत्य कुठे हरवत चालले आहे. अशा वेळी निर्भीड पत्रकार नवनाथ आडे हे सत्य शोधून, त्याला आवाज देतात. ते समाजासाठी दीपस्तंभासारखे असतात. अंधारात प्रकाश दाखवतात. त्यामुळे अशा पत्रकारांचा आदर करणे, त्यांचे संरक्षण करणे आणि त्यांना पाठिंबा देणे ही प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे.

निर्भीड पत्रकाराच्या वाटेवर अनेक काटे असतात. धमक्या, खोट्या आरोपांखाली गुंतवणे, सामाजिक बहिष्कार, आर्थिक अडचणी या सगळ्या गोष्टींना सामोरं जात तो आपलं काम करत राहतो. काही वेळा या संघर्षात त्याला आपला जीवही गमवावा लागतो. पण अशाही परिस्थितीत तो स्वतःला झुकू देत नाही.



उद्धव आरे, बीड
शब्द संकलन : मो : ७७४१९९२०२०

नवनाथ हाडे हे नाव आज पत्रकारितेच्या क्षेत्रात निर्भीडतेचे प्रतीक बनले आहे. सत्ता, प्रशासन आणि गुन्हेगारी यांच्यातील साठगाठ उघड करणाऱ्या त्यांच्या बातम्या समाजात खळबळ उडवणाऱ्या ठरल्या आहेत. कोणतीही भीती न बाळगता लोकांच्या प्रश्नासाठी संघर्ष करणारा पत्रकार म्हणून त्यांची ओळख तयार झाली आहे.

नवनाथ आडे यांनी अनेक घोटाळ्यांवर प्रकाश टाकला असून, भ्रष्टाचार सामाजिक अन्याय, दलाली आणि प्रशासनातील हलगर्जीपणा यावर त्यांनी वेळोवेळी आवाज उठवला आहे. त्यांच्या लिखाणामुळे अनेक प्रकरणे उजेडात आली आहेत आणि संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले गेले आहे. त्यांच्या पत्रकारितेमुळे अनेकांना न्याय मिळाला आहे आणि नागरिकांमध्ये जागरूक निर्माण झाली आहे. त्यांच्या कार्यामुळे लोकशाहीचा चौथास्तंभ म्हणून ओळखली जाणारी पत्रकारिता अधिक मजबूत होत आहे.

---

## ७० कलाकार, एकच रंगमंच; बीडमध्ये 'रेंज पाहिजे' नाटकाच्या तालमीला सुरुवात!

बीड । प्रतिनिधी

अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीडच्या रंगभूमी नवचैतन्याचा श्वास घेणार आहे. लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत आणि सोनल नहार लिखित 'रेंज पाहिजे' या दोन अंकी नाटकाची निर्मिती करण्यात येत असून काल दि.११ जुलै २०२५ रोजी सायंकाळच्या दरम्यान गुरुपौर्णिमेच्या मंगलमय दिनी नटराजाच्या पावन साक्षीने या नाटकाच्या तालमीचा भव्य शुभारंभपार पडला. जेष्ठ पत्रकार व दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर तसेच ट्विंकलिंग स्टार स्कूलचे संस्थाचालक गणेश मैड यांच्या शुभहस्ते या नाट्यप्रयोगाच्या तालमीचा प्रारंभ आणि पोस्टर प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.



'आम्ही कलावंत प्रस्तुत रेंज पाहिजे' या नाटकाचे दिग्दर्शन लक्ष्मीकांत दोडके यांच्याकडे असून या नाटकाचे लेखन सौ. सोनलताई नहार यांनी केले आहे. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून रोहित पुराणिक आपले योगदान देणार आहेत. दरम्यान उदघाटक संतोष मानूरकर व गणेश मैड यांनी संपूर्ण नाट्यसंघाला मनःपूर्वक शुभेच्छा देत कलाकारांचे मनोबल उंचावले. या नाटकात बीडमधील तब्बल ७० कलाकार सहभागी होतायत हेच या नाटकाचे खरे सामर्थ्य ठरणार असून या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून बीडची रंगभूमी पुन्हा नवचैतन्याने फुलणार असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी रेंज पाहिजे या नाटकातील सहभागी कलाकार तसेच पालक उपस्थित होते.

नवोदित कलाकारांना एकत्र आणून त्यांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने या नाटकाची निर्मिती होत आहे व कालपासूनच या नाटकाची तालीम सुरु झाली आहे. येत्या ऑगस्ट महिन्यात 'रेंज पाहिजे' या नाटकाचा भव्य रंगमंचीय सादरीकरण प्रयोग रसिक प्रेक्षकांसमोर सादर होणार आहे, अशी माहिती या नाटकाचे निर्मिती सूत्रधार प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

---

## शेतकऱ्यांच्या पीक कर्जाला होल्ड न लावता मुदतवाढ द्या : मोरे, खेडकर

शिरूर कासार । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी पीक कर्ज न भरल्याने आणि रिनिव्हल न केल्याने संबंधित बँकेकडून शेतकऱ्यांचे बचत खाते होल्ड केले जात आहेत परंतु सध्या शेतकऱ्यांनी शेती शेतीविषयक कामे सुरू आहेत आणि अनेक शेतकऱ्यांचे मुल विविध क्षेत्रात शिक्षण घेत आहेत अशाप्रकारे बचत खाते होल्ड केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे बँक अकाउंट होल्ड न करता मुदत वाढ अथवा इतर काही पर्याय करण्यात यावा अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्यातर्फे होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी पीक कर्ज न भरल्याने त्यांच्या बचत खात्यावर संबंधित बँकेकडून होल्ड लावला असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या.



यावर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज भरण्याबाबत बचत खाते होल्ड न करता इतर नियमोचित व्यवस्था अथवा मुदतवाढ प्रणालीची वापर करून तगादा न लावता कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची काळजी घेत मार्ग काढण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने केली आहे. याबाबत जिल्हा अग्रणी बँक प्रशासन विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी मागणी केली आहे.

---

## बीड जिल्ह्यातून बदलून गेलेल्या अधिकाऱ्यांचा ही बीड येथील लोक जिव्हाळा ठेवतात : प्रा. ईश्वर मुंडे

### अधिवेशना दरम्यान नवल किशोर राम व प्रा.ईश्वर मुंडे यांची सदिच्छा भेट

धारूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व शेती आधारीत उत्पन्न कमी असले तरी बीड जिल्ह्यातील लोक कष्टाळू, मेहनती तेवढेच प्रेमळ आहेत. बीड जिल्ह्यात अधिकारी म्हणून आलेल्या प्रामाणीक अधिकाऱ्यांना सहकार्य व प्रेम देऊन त्यांना डोक्यावर घेतात याची अनेक उदाहरणे घडलेले आहेत. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार, स्वेच्छा सेवानिवृत्त विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर तसेच जिल्हाधिकारी नवल किशोर राम, अशोक धिवरे, अखिलेश कुमार या आय ए एस व आय पी एस अधिकाऱ्यांची नावे सर्व जिल्हा वासियांच्या मनात व ओठांवर आहेत.



सध्या महाराष्ट्र राज्याचे पावसाळी अधिवेशन विधान भवन मुंबई येथे चालू आहे. या हे अधिवेशनादरम्यान स्वेच्छा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी व सध्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व पुणे महानगर पालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांची भेट झाली. उभयतांनी स्मीत हास्य करत प्रेमाणे हस्तांदोलन केले. बीड जिल्ह्यातील विविध विषयांवर थोडक्यात चर्चा केली. बीड जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी बीड जिल्ह्यात नाविन्यपूर्ण काम केले होते. त्यांची बीडनंतर जिल्हाधिकारी संभाजीनगर, जिल्हाधिकारी पुणे, पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे बदली झाली. आता ते पुणे महानगर पालिकेचे आयुक्त आहेत. प्रा.ईश्वर मुंडे व नवल किशोर राम यांची भेट म्हणजे अधिकारी बीड जिल्ह्यातून बदलून गेले तरी जिल्ह्यातील लोक आठवणी, प्रेम व जिव्हाळा कायम ठेवतात हेच सिध्द होते.

---

## मानवी हक्क अभियान च्या इशारा मोर्चाला हजारोच्या संख्येने उपस्थित राहा : लखन थडके

माजलगाव । प्रतिनिधी



उपविभागीय कार्यालय माजलगांव या ठिकाणी दि. १४ जुलै वार सोमवार ठीक १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने इशारा मोर्चा होणार आहे. विविध मागण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चाचे नेतृत्व राजेश भाऊ क्षीरसागर हे करणार आहेत. या मोर्चाला माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान लखन पांडुरंग थडके यांनी केले आहे.

---

## मानवी हक्क अभियानच्या वतीने होणाऱ्या इशारा मोर्चास हजारोच्या संख्येने उपस्थित रहा : मारोती भिसे

सिरसदेवी । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील उपविभागीय कार्यालय या ठिकाणी दि, १४.७.२०२५. वार सोमवार १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते माजलगाव उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने विविध मागण्या घेऊन इशारा मोर्चा होणार आहे.



मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद नाना आव्हाड यांच्या उपस्थितीमध्ये गायरान धारकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे नेतृत्व मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर करणार आहेत. या मोर्चाला माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी आणि गायरान धारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मानवी हक्क अभियानचे ऊसतोड कामगार सेना गेवराई तालुका अध्यक्ष मारोती भिसे यांनी केले आहे.

---

## दिवसभर उसाच्या फडात काम; मेहनतीच्या जोरावर आदिवासी तरूणाची पोलीस दलात निवड!

दौलावडगाव । प्रतिनिधी

घरची परिस्थिती अंत्यत हालखीची, दिवसभर काम केल्याशिवाय चूल पेटत नाही. अशातच आई, वडिलासोबत हाती कोयता घेऊन उसाचा फड गाठला. दिवसभर आई, वडिलांना ऊस तोडायला मदत आणि घरी गेल्यावर रात्री कोप्यावर अभ्यास करत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आदिवाशी समाजातील गणेश ची पोलीस दलात नुकतीच निवड झाली आहे.

आष्टी तालुक्यातील लोंखडवाडी येथील राजू भाऊसाहेब माळी हे आदिवासी समाजातील असून हाताला कसलेच काम नसल्याने दिवसभर लोकांच्या शेतात जाऊन पत्नी उषाला सोबत घेऊन काम करायचे. परिस्थिती बिकट असल्याने अनत अडचणी यायच्या. दोन मुल



घरात असल्याने कष्ट करून आपल्या पोटाला वेळप्रसंगी चिमटे घेऊन मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. यातील मोठा मुलगा गणेश याचे बारावी पर्यंतचे शिक्षण अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील आल्हणवाडी येथे केले. हे शिक्षण पुर्ण झाल्यावर तो पुढील शिक्षण कडा येथे बाहेरून घेऊ लागला. आई, वडिलांचे कष्ट पाहवत नसल्याने त्याने कोयता हातात घेतला आणि थेट उसाचा फड गाठला.

तिथे दिवसभर आई, वडिलांना उसतोडणीसाठी मदत करारचा. रात्री कोप्यावर आल्यानंतर अभ्यास करायचा. हे करत असताना त्याने अभ्यासात सातत्य ठेवले. घरी आल्यानंतर देखील तो अभ्यास न चूकता करारचा. काही महिन्यापुर्वी तो मुंबई येथे पोलीस भरतीसाठी गेला होता. परिक्षा दिली आणि मागील महिन्यात त्याची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याचा मेसेज देखील आल्याने त्याच्या कष्टाचे चीज झाल्याचे दिसुन आले.

---



आषाढी एकादशी दिंडी सोहळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरवन पिंपरी येथे सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक सामाजिक भावना निर्माण होण्यासाठी दिनांक ५/७/२०२५ रोजी दिंडी आयोजित केली. यावेळी गावातील सर्व शिक्षक व ग्रामस्थ मंडळ.

---

## आष्टी तालक्यातील सन २०२५ – २०३० सरपंच पदाचे आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सर्व जनतेस जाहीर आवाहन करण्यात येते की , मा. जिल्हाधिकारी बीड यांचे अधिसूचना जा.क्र.२०२५/जिबी/डेस्क–२/२०२५ – २०३० ग्रा.पं. सरपंच आरक्षण /कावि–१६९१ दि.०८/०७/२०२५ अन्वये ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील राजपत्र असाधारण भाग चार–ब दि.१३/०६/२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता (सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी) गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता सरपंच पदासाठी सोडत पध्दतीने आरक्षण नव्याने दि.१५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसिल कार्यालयाचे सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.



तरी सर्व नागरीकांनी तालुक्यातील १२५ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास तहसिल कार्यालय आष्टी येथील सभागृहात दि. १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

---

## ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष!

### प्रसिद्धी माध्यमांचे मनस्वी आभार : रमेश गंगाधरे, एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष देत असल्याचे मत रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ यांनी व्यक्त करत प्रसिद्धी माध्यमांचे आभार मानले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी सन २०१४ सालापासून लढा सुरू आहे. गेल्या ११ वर्षात याविषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार एवढेच नव्हे तर जिल्हा पोलीस अधीक्षकांना सुद्धा वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. या लढ्यास लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातूनही वेळोवेळी वाचा फोडण्यात आलेली आहे. या लढ्यास बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील वृत्तपत्रांकडूनही तेवढ्याच तोलामोलाचे सहकार्य मिळत आहे. यामुळे कारंजा टॉवर चा विषय आता फक्त बीड शहर किंवा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता मराठवाड्यासह महाराष्ट्रात सुद्धा पोहोचला आहे. कारंजा टॉवरसाठी नागरिक पुढे येऊन स्वखर्चाने एक–एक कामे मार्गी लावत आहेत. गेल्या काही महिन्यात लोकसहभागातून कारंजा टॉवरसाठी ५ कामे झाली आहेत. तरीही उर्वरित १२ कामे अजून बाकी आहेत. याकरिता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना सातत्याने निवेदन रुपात आठवण करून देण्याचे कार्य नित्यनेमाने केले जात आहे. शिवाय शासन–प्रशासन जागरूक व्हावे, याकरिता प्रसिद्धी माध्यमातून सातत्याने बातम्या व लेख प्रकाशित करण्यासाठी दिले जात आहे. मात्र शासन–प्रशासनाकडून अजूनही या ऐतिहासिक वास्तूकरिता ठोस कार्य करण्यासाठी पाऊल उचलले जात नाहीये. यामुळे लढा अजून संपलेला नाही तर सुरूच आहे. जोपर्यंत परिपूर्ण नूतनीकरण होणार नाही, तोपर्यंत ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी लढा सुरूच राहणार आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष ठेवणार असल्याचे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी व्यक्त केले आहे.




---



## लेखणीचा बादशाह चंदन पठाण हे वाढदिवसानिमित्त सत्कारित

बीड । प्रतिनिधी

येथे स्थायिक असलेले चौसाळाचे भूमिपुत्र संयमी होतकरू स्वयं कर्तुत्वाने स्वतःला सिद्ध कराणारे व्यक्तीमत्व आणि पत्रकारितेतील 'वस्ताद' व सामाजिकतेचं भान आणि कर्तव्याची जाण यांचा मेळ घालून आयुष्यभर सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी धडपडणारे नेतृत्व तसेच पत्रकारिता क्षेत्रातील लेखणीचे शिलेदार, 'स्ट्रगल' या शब्दाचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल तर या माणसाला एकदा भेटाच.

पत्रकार, शिक्षक याही पेक्षा एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून चंदन पठाण सर यांची ओळख आहे. बरेच काही घेण्यासारखे, शिकण्याजोगे गुण असलेला, स्वकर्तृत्वाने आपल्या स्वप्नांची बाग फुलविणारा असा माणूस लाभणे भाग्यच. शिक्षक आणि पत्रकारिता यांचं ताळमेळ जुळवून घेणारे सायं.दैनिक सिटीझन चे कार्यकारी संपादक व दैनिक पार्श्वभुमीचे वृत्तसंपादक चंदन पठाण सर यांना वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा दिल्या. यावेळी दैनिक सिटीझन चे संपादक शेख मुजीब भाई, फहीम इनामदार, पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्गांवर मृत्यूचा सापळा, प्रशासन अजूनही झोपेत!

## प्रशासन किती निष्पापांचे बळी घेतल्यावर जागं होणार? आ.विजयसिंह पंडित यांचा विधानसभेत संतप्त सवाल

गेवराई । प्रतिनिधी

महामार्गावरील अपघातात मृत्युंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेवराईच्या गढी येथील प्राणांकित अपघातानंतर त्याच्या विश्लेषणात्मक अहवालात अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, सर्वोच्च न्यायालयाने अपघाताची गंभीर दखल घेतली. त्यावरही केवळ समित्यावर समित्या स्थापन करण्याचे काम करून प्रशासन फक्त कागदी घोडे नाचवत आहे. प्रशासन महामार्गावरील किती जणांच्या मृत्युची वाट पाहणार आहे? असा सवाल गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.

अपघातातील मृत्यु पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करा, निश्चित केलेल्या ब्लॅकस्पॉट बाबत सत्वर कार्यवाही करा, उड्डाण पुलांची कामे सुरु न करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करा आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्याची मागणी आमदार पंडित यांनी आज लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात केली. मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी या बाबत सकारात्मक उत्तर देवून पंडित यांच्या मागणीनुसार योग्य उपाय योजना करण्याचे आश्वास दिले. मे महिन्यातील २६ तारखेला गेवराईतील गढी येथील उड्डाण पुलावर झालेल्या प्राणांकित अपघातात सहा जणांचा मृत्यु झाला, हा गंभीर विषय आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित केला.



यावेळी बोलताना ते म्हणाले की, अपघातानंतर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या विश्लेषणात्मक अहवालात अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या समोरील उड्डाण पुल तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याचे या अहवालात नमुद करण्यात आले आहे. अहवाल आल्यानंतरही प्रशासनाने कार्यवाही केली नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे या गंभीर विषयी चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याची विनंती केली होती, मात्र त्यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केले. मात्र सर्वोच्च न्यायालयाने प्रकरणाची दखल घेतल्यानंतर गेंड्याची कातडी पांघरून बसलेल्या प्रशासनाला जाग आली. त्यांनी कागदी घोडे नाचवून समित्यावर समित्या गठीत करण्याचे काम केले. या महामार्गावर सतत अपघात होणारे ब्लॅकस्पॉट निश्चित झालेले असताना त्यात सुधारणा करण्याचे काम संबंधित विभाग का करत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

गेवराई विधानसभा मतदार संघातील जाणारे धुळे–सोलापूर आणि कल्याण–विशाखापट्टणम्‍ या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावर रस्ते अपघातात मृत्युमूखी पडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महामार्गावरील सिरसदेवी सारख्या मोठ्या गावाच्या ठिकाणी पावसाळ्यात अक्षरशः तलावाचे स्वरुप प्राप्त होते. याठिकाणी आजवर दहा ते अकरा जणांचा अपघात झाला आहे. सातत्याने पत्रव्यवहार करूनही केवळ काम मंजुर आहे, टेंडर होताच काम सुरु होईल अशा प्रकारची आश्वासने मिळतात मात्र प्रत्यक्षात काम होत नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी सभागृहात सांगितले. गेवराई शहराच्या लगत दोन्ही बाजूच्या प्रवेशिकेवर उड्डाण पुलांची कामे मंजुर आहेत. अग्रवाल नावाच्या कंत्राटदाराला ही कामे मिळाली असून ता ३१ मार्च रोजी त्याची मुदत पूर्ण झाली आहे असे असतानाही त्यांनी कामे सुरु केली नाहीत, या कंत्राटदाराविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे? असा प्रश्न आ. पंडित यांनी यावेळी उपस्थित केला. रस्ते अपघातात मृत्युमूखी पडलेल्या सहा जणांच्या वारसांना शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

### नागरिकांचा संताप : आमचा जीव एवढा स्वस्त आहे का?

अपघात झाल्यावर फक्त पंचनामा व नुकसानभरपाई याच्या पलीकडे सरकारने विचार करायला हवा. नागरीकांनी आता थेट विचारणं सुरू केलंय आमचा जीव एवढा स्वस्त आहे का? आम्ही रस्त्यावर निघालो की घरी परतू की नाही, याची हमी आहे का?

## असोला ते हसनाबाद रस्त्याची दयनीय अवस्था; तात्काळ उपाययोजना गरजेची



धारूर । प्रतिनिधी

असोला ते हसनाबाद दरम्यानचा रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे, उसवलेला मुरूम, आणि दगडांचे तुकडे पसरले आहेत. हा रस्ता गावाचा मुख्य संपर्क मार्ग असूनही आजवर त्याकडे कोणीही गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. नागरिकांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रुग्णवाहिका, शाळेची वाहने, दुचाकीस्वार, आणि वृद्ध व्यक्ती यांना या रस्त्यावरून प्रवास करणे हे अत्यंत धोकादायक ठरत आहे. विशेषतः पावसाळ्यात ही परिस्थिती आणखी बिकट होते. रस्त्यावर पाणी साचते, खड्डे अधिक खोल होतात, आणि अपघातांची शक्यता वाढते. या रस्त्याचा समावेश प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत आहे. या योजनेतून ग्रामीण भागातील रस्त्यांचे डांबरीकरण व देखभाल केली जाते. मात्र प्रत्यक्षात या मार्गावर काहीच काम झालेले दिसत नाही. स्थानिक प्रशासनाने व सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेण्याची गरज आहे.

सरकार योजना आणते, पण त्याची अंमलबजावणी झाली नाही तर ग्रामीण जनता कायमच पायदळी तुडवली जाते, अशा भावना आता गावकरी व्यक्त करत आहेत. रात्रीच्या वेळी रस्ता अडचणीचा बनतोय नागरिक होतायत त्रस्त याच रोड असोला येथे दवाखाना आहे. पण रात्रीच्या वेळी तिथं जायचं झालं तर रस्त्यामुळे खूप अडचण येते. अतिवश्यक वस्तूंसाठीही असोला गावी जावं लागतं, पण रस्ता इतका खराब आहे की जीव मुठीत धरून जावं लागतं.

## तलावात पडलेल्या चतुर कोल्ह्याला वाचवले

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शिरापुर येथे दोन दिवसापासून शेत तलावात पडलेल्या कोल्हयाची कडा येथील जीवदया फाऊंडेशन च्या प्राणीमित्राकडून जीवदान दिल्याची घटना घडली. याबाबत माहीती अशी की शिरापुर येथील रामदास देवकर यांच्या शेततलावमध्ये दोन दिवसापासून एक राखाडी कोल्हा पडलेला होता, कोल्हाने वर येण्यासाठी खुप प्रयत्न केले परंतु त्याला वर येत नसल्याने तो पाण्यात धडपडत होता हे पाहून युवराज देवकर यांनी कडा येथील प्राणीमित्र नितीन आळकुटे यांना या घटनेची माहीती दिली.

माहीती मिळताच आपल्या जीवदया टिम ला सोबत घेऊन शिरापुर गावात गेले शेत तलावातील कोल्हा पोहून पोहून दमला होता त्याचा जीव कासावीस झाला होता तरीही तो चतुरपणा दाखवत पाण्यात चकवा देत होता. अखेर धाडस दाखवत त्याला काढण्यात यश आले. तलावात उतरून कोल्ह्याचा जीव वाचवण्यासाठी प्राणीमित्र नितीन आळकुटे, राजु भोजने, शैलेंद्र मिश्रा, गणेश पवळ यांनी प्रयत्न करत त्याला सुखरूप बाहेर काढले, बाहेर काढलेला चतुर कोल्हा पंधरा मिनिटं शांत बसून पुन्हा निसर्गात धूम ठोकली. कुठेही वन्यजीव सकटात असल्यास कडा येथील जीवदया टीम कळवावे.



## धारूर तालूक्यातील ५६ ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण सोडत १५ जुलै रोजी

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील ५६ ग्रामपंचायत च्या सरपंच पदाच्या पुढील पाच वर्षाच्या आरक्षणाची सोडत १५ जुलै रोजी तहसील कार्यालयातील सभागृहात ठेवण्यात आली असून सर्व तालुक्यातील नागरिकांनी या आरक्षण सोडवतील उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे.

धारूर तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहण करण्यात आले आहे की, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील राजपत्र असाधारण भाग–चार ब, दि.१३/०६/२०२५ तसेच जिल्हाधिकारी बीड यांची अधिसूचना दिलेल्या सुचनेप्रमाणे महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम, १९६४ च्या नियम ३ अ प्रमाणे तालुकानिहाय जिल्हयातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी व महिलांसाठी पाच वर्षाकरिता (सन–२०२५ ते २०३० या दरम्यान गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता) आरक्षित करून संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. धारूर तालुक्याचा आरक्षण तपशिल सरपंच पदे पुढील प्रमाणे अनुसूचित जाती–०९ पदे, अनुसूचित जमाती–०२ पदे, नागरिकांचा मागास प्रवर्ग–१५ पदे, खुला प्रवर्ग–३० पदे असे एकुण ५६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षणसोडत दि. १५/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. तळमजला, तहसिल कार्यालय धारूर येथे काढण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील नागरिकांनी उक्त दिनांक रोजी सदरचे आरक्षण सोडतीस उपस्थित रहावे असे आव्हान तहसीलदार श्रीकांत निळे व नायब तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी केले आहे.

## सिरसाळा पोलीस ठाण्यात तीन चंदन चोरावर काल दुपारनंतर गुन्हा दाखल

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा परळी तालुक्यातील औरंगपुर येथील हानुमंत नामदेव नागरगोजे वय ५० वर्ष व्यवसाय शेती याच्या फिर्यादीवरून दि.९जुलै रोजी रात्री ८ च्या दरम्यान गावातील इसम उमेश लाहाणे याने कळविले कि माझ्या शेतातील दोन चंदनाचे झाडे तोडत असताना दोन इसम त्या कडील मोटरसायकल क्रमांक एम.एच. ४५/९१७४ सह मिळुन आलयाने आम्ही त्याना तिथेच पकडले.



त्यावरून भी व माझ्या सोबत ज्ञानेश्वर लाहाणे सोबत पाच ते साहा लोक घटनेच्या ठिकाणी गेलो तोपर्यंत इसमानी चंदनाचे झाड तोडुन त्यातील गाभा चोरल्याची खात्री पटल्याने त्याविषयी पोलीस स्टेशन सिरसाळा येथे कळविण्याने पोलीस तात्काळ आले. व पोलीसाची सदर इसमाकडे विचारपूस केली आसता सदर दोन इसमाची नावे अशोक साहेबराव भोसले वय ५० वर्ष रा.खामगाव ता.परळी जि.बीड, सुरज परमेश्वर काळे वय २० वर्ष रा.टेभ्रुणी ता.माळा जि. सोलापूर ह.मु.मदिनानगर, सिरसाळा, पपु जाधव वय ४० वर्ष रा.परळी ता.जि बीड असे सांगितले. दि.१० जुलै रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास मला माझा भाऊ राम नामदेव नागरगोजे. यांनी फोन वरून कळविले कि.गटनं ३९०.३९१ मधील दोन चंदनाचे झाडे तोडून त्यामधील गाभा काढुन चोरून नेला आहे.

असे कळविल्यावरुन पोलीस स्टेशन येथील बीट अंमलदार शेगुळे व घोळवे यांना फोन वरून वरील घटनेबाबत माहिती दिली. त्यावर पोलीस स्टेशन सिरसाळ्याचे एपीआय गोरखनाथ दहिफळे व पीएसआय आनंद जाधव याच्या मार्गदर्शनाखाली सिरसाळा पोलीस ठाण्याचा पूर्ण ताफा घेऊन हे वरील घडलेल्या घटनेच्या ठिकाणी येऊन त्या ठिकाणची पाहणी केली त्यानंतर दि.१० जुलै रोजी पोलिस ठाणे सिरसाळा येथील वरील घटनेबाबत चौकशी होऊन दोन ईसमा च्या नावे अखेर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सिरसाळा पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे हे तपास करीत आहेत.

## तांबवा शिवारातुन शेतकऱ्याच्या सोलार पॅनलची चोरी

केज । प्रतिनिधी

थांबवा शिवारातील शेतकऱ्याच्या शेता मधील सोलर पॅनलची अज्ञात चोरट्याने चोरी केली असून या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, मौजे तांबवा येथील शेतकरी महेश मोहनराव सत्वधर राहणार समर्थ नगर, केज तालुका केज जिल्हा बीड येथील रहिवासी असून त्यांचे शेत तांबवा शिवारामध्ये सर्वे नंबर १९०/२ मध्ये आहे. त्यांच्या शेतामध्ये दिनांक ०३/०७/२०२५ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे शेतकऱ्यांसाठी अनुदानित ३ एच पी सोलार पंप बसवण्यात आला होता. दररोज प्रमाणे ते शेतामध्ये गेले असता त्यावेळी त्यांना असे लक्षात आले की, इन्स्टॉल केलेले तीन एच पी सोलर मोटरचे सहापैकी तीन सोलर पॅनल जागेवरती नाहीत त्यांनीआजूबाजूला शोध घेतला असता असे लक्षात आले की, शेतामधील आणखीन पेरणी यंत्र म्हणजे टोकन मशीन हे देखील नव्हती. तथापि सदर शेतकऱ्यांने पोलीस स्टेशन केज येथे तक्रार दाखल केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलिस करीत आहेत.

## माजलगाव येथे होणाऱ्या गायरान धारकांच्या मोर्च्याला हजारोंच्या संखेने उपस्थित राहा : लोखंडे

धारूर । प्रतिनिधी



आणेक वर्षापासून प्रलंबित असलेला उपजीविकेचा/ जिव्हाळ्याचा प्रश्न गायरान जमिनीवर अतिक्रमणे करून जमिनी कसून आपल्या घराचा उदर निर्वाह करत आहेत त्या गोर–गरीब, कष्टकरी, दलित, भूमिहीन वंचित समाजातील लोकांच्या नावे ती गायरान जमीन करुन त्या लोकांना न्याय द्यावा म्हणून मानवी हाक्क अभियान च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर कर्मवीर एकनाथरावजी आवाड साहेबांनी लढा उभा केला.

या देशातील दलित, मागासलेला समाज आपल्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रिये मध्ये यावा लोकांच्या शेतात राब–राब राबणारा भूमिहीन कष्टकरी जमीनदार व्हावा या साठी मानवी हाक्क आभियान ही संघटांना गेल्या आणेक दशकांपासून काम करत आहे. पुन्हा: एकदा या झोपेच सोंग करुन झोपलेल्या सरकारला जाग आणण्यासाठी मा.प्रा. मिलिंद (नाना) आवाड यांच्या नर्तृत्वाखाली माजलगाव येथे जवाब दो मोर्च्या आयोजित करून प्रशासन आणि सरकारच्या डोळ्यावरची पट्टी काडन्यासाठी जिल्ह्यातील संपूर्ण तालुके परिसर पिंजून काडत मोर्च्याला उपस्थित राहण्याचे आव्हावण करतांना कर्तव्य दक्ष कार्येकर्ते तालुका आध्यक्ष किसन दादा लोखंडे, महादेव उमाप, अंकुश लोखंडे, धर्मराज लोखंडे जोगदंड आणि इतर सहकारी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही : अमरसिंह पंडित

### आनंदवाडीचे सतिष चव्हाण यांच्यासह शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

गेवराई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीबद्दलचा विश्वास जनसामान्यात वाढत आहे. राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून सर्व समावेशक विकास कामे होत आहेत. याच जोरावर ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत. नवीन प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या माध्यमातून आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे, कार्यकर्त्यांच्या या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. त्यांच्या उपस्थितीत मौजे आनंदवाडी येथील सतीश चव्हाण यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला, यावेळी ते बोलत होते.



व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरु आहे. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते पक्षप्रवेश करत आहेत. शुक्रवार, दि.११ जुलै रोजी तलवाडा जिल्हा परिषद गटातील मौजे आनंदवाडी येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते सतीश चव्हाण यांनी त्यांचे सहकारी ज्ञानेश्वर चव्हाण, रामेश्वर चव्हाण, अनिल चव्हाण, बालाजी गायकवाड, जयराम गायकवाड, सखाराम चव्हाण, भागवत चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, जयराम नरवडे, राहुल चव्हाण, दादा गायकवाड, लक्ष्मण चव्हाण, प्रदीप तांगडे, गहीनाथ तांगडे, रामेश्वर तांगडे, तुकाराम चव्हाण, भास्कर चव्हाण, अविनाश गायकवाड, गणेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, गणेश चव्हाण, अरविंद पवार, बळीराम चव्हाण, संतोष हातागळे, किशोर हातागळे, भैय्या हातागळे, अनिल हातागळे, रमेश हातागळे, विजय हातागळे, भीमा हातागळे, भरून हातागळे, जितेंद्र हातागळे, विजय हातागळे आदी शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये आनंदवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये स्वागत केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी सभापती आसाराम मराठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक आतकरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादी युवकचे विधानसभा क्षेत्र अध्यक्ष गजानन काळे, माजी सरपंच विष्णू हत्ते, मनोज हजारे, सरपंच रामप्रसाद चाळक, विठ्ठल चव्हाण, रणजीत घुंबार्डे, सरपंच राधेश्याम चक्कर, बंटी सौंदरमल, लहू लोखंडे, विजय सुतार, नजीम कुरेशी, प्रकाश चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT